सकाळ

सांगली, शनिवार, २८ सप्टेंबर २०१९ ७



रामानंदनगर : आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना. संदीप नाझरे, प्राचार्य डॉ. एल. डी. कदम व अन्य.

# रामानंदनगर कॉलेजमध्ये भित्तीपत्रकावर आठवणींचा महापूर

अंकलखोप, ता. २७ : रामानंदनगर (ता. पलूस) येथे आर्टस सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये कर्मवीर जयंतीनिमित्त विविध उपक्रम झाले भित्तीपत्रकावर चित्र, कविता, अनुभवकथन अशा स्वरूपात विद्यार्थ्यांनी महापुराच्या आठवणी मांडल्या. भित्तीपत्रकाचे संपादन प्रा. मृणालिनी अहेर यांनी केले होते. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या अध्यक्षतेखाली, लेखक संदीप नाझरे यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन झाले. श्री. नाझरे म्हणाले, "कृष्णेला आलेल्या प्रलयंकारी महापूराने सर्वांच्याच मनात घर केले. अनेकांची घरेदारे, पशुधन, शेती उध्वस्त झाली. महापुरात संवेदनशीलता, माणुसकीच्या भावनेतून दुष्काळग्रस्त भागातून पुरग्रस्तांसाठी मिळालेली लाखमोलाची मदत. हे सारे अनुभव विद्यार्थ्यांच्या मनाला अस्वस्थ करत असल्याचे जाणवल्यावर त्यांच्या मनातील महापूराच्या आठवणींना साद घालत अभिव्यक्त करण्याची संधी भित्तीपत्रकाच्या माध्यमातून कॉलेजने उपलब्ध करून दिली आहे.''

कर्मवीर जयंतीनिमित्त निबंध, काव्यवाचन, पाककला, मेहंदी, रांगोळी, पुष्परचना आदी स्पर्धा झाल्या. उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले, प्रा. प्रतिभा पुदाले, यु. एस. शेळके, डॉ. उज्वला पाटील, अरविंद औंधकर यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.